# प्रेस नोट

जा.क्र. ३२०/माहिती कक्ष/
पोलीस उपअधिक्षक गृह भंडारा
दिनांक २२/०६/२०१८

**" विनयभंग करणाऱ्या आरोपीस एक वर्ष सश्रम कारावास व द्रव्यदंडाची शिक्षा "**

पोलीस ठाणे भंडारा अंतर्गत यातील पिडित अल्पवयीन मुलगी, वय १७ वर्ष हिचे विनयभंग करणारा आरोपी नामे मिनेश्वर उर्फ मनिष सुखाजी मने, वय ३० वर्षे, रा. रामनगर पांढराबोडी रोड भंडारा ता. जि. भंडारा यास आज दिनांक २२/०६/२०१८ रोजी अतिरीक्त सत्र न्यायाधिश श्री. आर. पी. पांडे सा. यांनी आरोपी विरूध्द विनयभंगाचे गुन्हयात आरोप सिध्द झाल्याने एक वर्ष सश्रम कारावास व २०००/ रूपये द्रव्यदंडाची शिक्षा सुनावली.

याबाबत अधिक माहिती अशी की, यातील पिडित अल्पवयीन मुलगी भंडारा येथे भाडयाचे खोलीत राहुन शिक्षण घेत असुन कापड दुकाणात काम करीत होती. दिनांक २८/०१/२०१३ रोजी सायंकाळी ६.०० वा. दरम्यान आपले मैत्रीन सोबत नविन भाडयाने घेतलेल्या खोलीचे घरमालकास भेटण्याकरीता जात असता माकडे मोहल्ला येथे पिडितेचे बहिनीचा पती आरोपी नामे मिनेश्वर उर्फ मनिष सुखाजी मने हा त्यांचे जवळ येवुन पिडितेचा हात पकडुन अश्लिल शिवीगाळ करून विनयभंग केला. पिडितेने आरोपीस प्रतिकार करून निघुन गेल्या. पिडित अल्पवयीन मुलीने पोलीस ठाणे भंडारा येथे घटणेबाबत तोंडी तक्रार दिलेवरून पो.स्टे. ला आरोपी विरूध्द अप.क्र. ५१/१३ कलम ३५४, ५०९ भादंवि अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला.

सदर गुन्हयाचा तपास परिवेक्षाधिन महिला पोलीस उप निरीक्षक पी. एस. कराडे यांनी करून गुन्हयात आरोपी नामे मिनेश्वर उर्फ मनिष सुखाजी मने, वय ३० वर्षे, रा. रामनगर पांढराबोडी रोड भंडारा यास अटक केली व आरोपी विरूध्द भरपुर साक्ष पुरावा प्राप्त झाल्याने गुन्हयात बाल लैंगिक अत्याचार प्रतिबंधक अधिनियम २०१२ कलम १२ वाढ करून आरोपी विरूध्द मा. विशेष सत्र न्यायालय भंडारा येथे आरोपपत्र दाखल केले. आरोपपत्रास स्पे. केस क्र. २२/१३ अन्वये सुनावणी करीता ठेवण्यात आले.

सदर गुन्हयाची सुनावणी **मा. अतिरीक्त सत्र न्यायाधिश श्री. आर. पी. पांडे सा.** यांचे समक्ष चालली असुन सरकार पक्षातर्फे **ॲव्होकेट दुर्गा तलमले, सहा. सरकारी अभियोक्त्या**, सत्र न्यायालय भंडारा यांनी योग्य बाजु मांडुन साक्षदार तपासले. आज दिनांक २२/०६/२०१८ रोजी आरोपी नामे मिनेश्वर उर्फ मनिष सुखाजी मने याचे विरूध्द आरोप सिध्द झाल्याने **कलम ३५४ भादंवि अन्वये एक वर्ष सश्रम कारावास व १०००/ रूपये दंड व कलम ५०९ भादंवि अन्वये एक वर्ष सश्रम कारावास व १०००/ रूपये दंड अशा शिक्षेचे आदेश देण्यात आला.** सदर गुन्हयात पोलीस निरीक्षक रविंद्र मानकर, ठाणेदार पो.स्टे. भंडारा यांचे मार्गदर्शनात पो.हवा. हर्षवर्धन मेश्राम/६२४ यांनी योग्य पैरवी अधिकारी म्हणुन कामकाज केले.

**( महाराष्ट्र पोलीस दल, जिल्हा भंडारा तसेच सरकारी अभियोक्ता वर्ग जिल्हा व सत्र न्यायालय भंडारा तर्फे जनतेस निर्भीउपणे गुन्हयाचे दोषसिध्द करीता व महिलांवरील अत्याचार रोखण्याकरीता पोलीसांना पंच व साक्षदार म्हणुन सहकार्य करण्याचे जाहिर आवाहन करण्यात येत आहे. )**

22/6/18
(डि. डब्ल्यु. मंडलवार)
प्र. पोलीस उपअधिक्षक गृह,
पोलीस मुख्यालय, भंडारा
दुरध्वनी क्र. ८८८८९६०५६०

**प्रति,**

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनीधी यांना उपरोक्त माहिती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्दी

करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत** : संगणक कक्ष, भंडारा याना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता